माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५मधील कलम १८(१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक: १२७/२०२२**

| तक्रारकर्ता | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपीलीय अधिकारी** |
| श्री. नरेशकुमार स्वरुपचंद जैन, मु. पो. ता. देवरी, जि. गोंदिया | विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नागपूर विभाग, नागपूर | विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नागपूर विभाग, नागपूर |

**सुनावणी दिनांक २७.०३.२०२५**

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार व्दितीय अपील क्र. २६१/२०२० मध्ये दिनांक २४.०२.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केलेला आहे. सदर तक्रारीवर यापुर्वी दिनांक ०१.०६.२०२३ व दि. २७.२.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यानंतर आज दिनांक २७.०३.२०२५ रोजी पुनश्च: सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, म. रा. मा. प.अ., नागपूर विभाग श्री. शैजेंद्र वि. भारती उपस्थित आहेत. तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना पर्यवेक्षक श्री. उल्हास श्री. घुई उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा यांच्या तर्फे श्रीम. रंजू भा. घोरमाडे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या व्दितीय अपील क्र. २६१/२०२० मध्ये दिनांक २४.०२.२०२२ रोजी सुनावणी घेवून पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

"अपिलार्थी यांनी जोडपत्र-अ अन्वये विहीत मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याचा आक्षेप घेत व कोणताही पत्रव्यवहार न झाल्याचा दावा करीता प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. याबाबतीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३.०१.२०२० रोजी सुनावणी घेवून अपील निकाली काढत असतांना उपलब्ध असलेली १ पृष्ठांची माहिती विनामुल्य पुरविण्यात यावी, असे आदेशीत केले. सदर आदेशाची प्रत दिनांक २७.०१.२०२० रोजी निर्गमित करण्यात आलेली आहे. वरील आदेशाच्या अनुषंगाने अपिलार्थीस दिनांक २८.०१.२०२० रोजी माहिती पुरविण्यात आलेली आहे. त्यानंतर त्याच दिवशी अपिलार्थी, श्री. जैन यांनी दिनांक २८.०१.२०२० रोजी आयोगासमोर द्वितीय अपील दाखल केले आहे. याबाबतीत जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहीत मुदतीत प्रतिसाद दिल्याचे आढळून येते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध असलेल्या माहितीचा पुरवठा अपिलार्थीस केल्याचे व प्रथम अपिलीय आदेशाची अंमलबजावणी केल्याचे आढळून येते. " या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात आला होता.

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

SD/ 27.03.2025/ E:\तक्रार क्र. 127-2022 जैन.docx

तक्रारकर्ता यांनी आयोगाच्या उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत दिनांक १७.०६.२०२२ (प्राप्त दिनांक २२.०६.२०२२) रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केलेला आहे. त्यामध्ये "जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८.०१.२०२० रोजी अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरविता मा. आयोगासमक्ष सुनावणी दरम्यान अपिलार्थीस माहिती पुरविल्याबाबत खोटी माहिती दिलेली असून मा. आयोगाची दिशाभूल केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी मला माहिती पुरविली असेल तर त्याबाबतचा पुरावा, कार्यालयीन प्रतवर माझी स्वाक्षरी किंवा डाकघरच्या पावतीवर माझी स्वाक्षरी यांच्या कार्यालयाच्या आस्थापना शाखेत असेलच याची कृपया खातरजमा करावी. ही विनंती. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपील निर्णय प्रत मला न पुरविल्यामुळे तसेच जन माहिती अधिकारी यांनी माहिती न पुरविल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये नियमानुसार दिनांक २८.०१.२०२० रोजी मा. आयोगासमक्ष द्वितीय अपील दाखल केली आहे. विषयांकित प्रकरणी कृपया सखोल चौकशी करावी व योग्य न्याय देण्यात यावा" असे नमुद केले आहे.

**युक्तीवाद/खुलासा:-** आयोगाने व्दितीय अपील क्र. २६१/२०२० मध्ये दिनांक २४.०२.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशात, तक्रारकर्ता यांना माहिती देण्याबाबत कोणतेही आदेश केले नाही. तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रारी संदर्भात त्यांना दोनवेळा आयोगात सुनावणीस बोलविण्यात आले. परंतु तक्रारकर्ता सुनावणीस दोन्ही वेळेस अनुपस्थित होते.

**निष्कर्ष:-** सदर तक्रारीसंदर्भात सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर असे निदर्शनास येते की,

१. तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना याआधीच माहिती पुरविल्याचे आढळून येते. सबब, सदर तक्रार निकाली काढणे योग्य ठरते.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर सत्यमेव जयते नागपूर

**ठिकाण :** **नागपूर**
**दिनांक:** **२७.०३.२०२५**

**(भुपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

जा.क्र. 2552 दि. 29 MAY 2025

SD/ 27.03.2025/ E:\तक्रार क्र. 127-2022 जैन.docx